सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३

# महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००

( दिनांक २९ आक्टोबर २०१२ पर्यंत सुधारित )

## MAHARASHTRA ACT NO. XXIII OF 2001

# The Maharashtra Seheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes, Other Backward Classes And Special Backward Category (Regulation of Issuance And Verification of) Caste Certificate Act, 2000

*( As modified upto 29 th October 2012 )*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२०१५

[ किंमत : रुपये ६.०० ]

(सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३)

# महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| उद्देशिका. | | | पृष्ठे |
| कलमें. | | | |
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. | . . | ५ |
| २. | व्याख्या. | . . | ५ |
| ३. | जाती प्रमाणपत्रासाठी अर्ज करणे. | . . | ५ |
| ४. | सक्षम प्राधिकाऱ्याने द्यावयाचे जाती प्रमाणपत्र. | . . | ५ |
| ५. | अपील. | . . | ५ |
| ६. | पडताळणी समितीकडून जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी. | . . | ५ |
| ७. | जातीची खोटी प्रमाणपत्रे जप्त करणे व रद्द करणे. | . . | ५ |
| ८. | सिध्द करण्याची जबाबदारी. | . . | ५ |
| ९. | सक्षम प्राधिकारी, अपील प्राधिकरण व पडताळणी समिती यांना दिवाणी न्यायालयाचा अधिकार असणे. | . . | ५ |
| १०. | जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे प्राप्त करण्यात आलेले लाभ काढून घेणे. | . . | ५ |
| ११. | अपराध व शास्ती. | . . | ५ |
| १२. | या अधिनियमाखालील अपराध दखलपात्र व बेजमानती असणे. | . . | ५ |
| १३. | जातीचे खोटे प्रमाणपत्र देणाऱ्यास शास्ती. | . . | ५ |
| १४. | अपप्रेरणा दिल्याबदल शास्ती. | . . | ५ |
| १५. | दिवाणी न्यायालयांच्या अधिकारीतेस रोध. | . . | ५ |
| १६. | सद्भावनापूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण. | . . | ५ |
| १७. | या अधिनियमाच्या तरतुदी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदीमध्ये अधिक भर घालणे. | . . | ५ |
| १८. | नियम तयार करण्याचा अधिकार. | . . | ५ |
| १९. | अडचणी दूर करण्याचा अधिकार. | . . | ५ |


---

# सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३[1]

## [महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००.]

**[(या अधिनियमाला राष्ट्रपती यांची अनुमती दिनांक १६ मे २००१ रोजी मिळाल्यानंतर तो महाराष्ट्र राजपत्र, असाधारण, भाग चार मध्ये दिनांक २३ मे २००१ रोजी प्रथम प्रसिध्द करण्यात आला)]**

**अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील व्यक्ती यांना जातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राची पडताळणी करणे या बाबींचे विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील व्यक्ती, यांना जातीची प्रमाणपत्रे देणे व अशा प्रमाणपत्रांची पडताळणी करणे या बाबींचे विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे, इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एक्कावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दिनांकास अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(क) “ जाती प्रमाणपत्र ” याचा अर्थ अर्जदार, यथास्थिती, कोणत्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागासप्रवर्गाचा आहे, याचा निर्देश केलेले सक्षम प्राधिकाऱ्याने अर्जदाराला दिलेले प्रमाणपत्र असा आहे ; व्याख्या.

(ख) “ सक्षम प्राधिकारी ” याचा अर्थ, शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा अशा प्रयोजनासाठी जाती प्रमाणपत्र देण्याकरिता प्राधिकृत केलेला अधिकारी किंवा प्राधिकारी असा आहे आणि अन्यथा विनिर्दिष्ट करण्यात आले असेल त्याखेरीज यात अर्जदार जेथील मूळ रहिवासी असेल त्या क्षेत्रावर किंवा त्या जागेवर अधिकारिता असलेल्या हे विधेयक अंमलात येण्यापूर्वी शासनाने यापूर्वीच पदनिर्देशित केलेल्या सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांचा समावेश होतो ;

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, दिनांक ३१ मार्च, २००० चे महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-पाच-अ, असाधारण, पृष्ठ १७८ पहावे.

२. आदिवासी विकास विभाग क्रं एसटीसी-१००१/प्र.क्र.२७/डी-एक्सए दिनांक १७ आक्टोबर २००१ रोजीच्या शासकीय अधिसुचनेद्वारे, दिनांक १८ आक्टोबर २००१ पासून हा अधिनियम अंमलात आला.

(ग) " विमुक्त जाती " याचा अर्थ शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या जमाती ;

(घ) " शैक्षणिक संस्था " याचा अर्थ कोणतीही शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, पदवी महाविद्यालय, शिक्षण महाविद्यालय, तंत्रनिकेतन, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ललित कला व वास्तुशास्त्र महाविद्यालय, संगीत व नृत्य महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय, कृषि महाविद्यालय, पशुवैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय महाविद्यालय, दंत महाविद्यालय, आयुर्वेदिक महाविद्यालय, होमीओपॅथीक महाविद्यालय, युनानी महाविद्यालय, परिचारिका प्रशिक्षण विद्यालय, आरोग्य व्हीजीटर्स प्रशिक्षण संस्था, व्यवसाय प्रशिक्षण संस्था, अभिमत विद्यापीठ, मुक्त विद्यापीठ व राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही विद्यापीठाच्या नियंत्रणाखालील विविध महाविद्यालये आणि शासन वेळोवेळी अधिसूचीत करील अशा अनन्यतः किंवा इतर कामाबरोबरचे शिक्षण देणारी अशी कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारी अन्य संस्था, असा आहे ;

(ङ) " शासन " याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे ;

(च) " स्थानिक प्राधिकरण " याचा अर्थ, एखाद्या महानगरपालिकेच्या अधिकारितेत येणाऱ्या स्थानिक क्षेत्रांच्या संबंधात, संबंधित महानगरपालिका असा, असून राज्यातील कोणत्याही अन्य स्थानिक क्षेत्रांच्या संबंधात, अशा स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असलेली संबंधित नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती, औद्योगिक नगरी, नगर पंचायत किंवा ग्राम पंचायत असा आहे ;

(छ) " भटक्या जमाती " याचा अर्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उपजीवीकेच्या शोधार्थ भटकंती करणाऱ्या शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या जमाती, असा आहे ;

(ज) " इतर मागासवर्ग " याचा अर्थ शासनाने घोषित केलेला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या नागरिकांचा वर्ग, आणि त्यात भारत सरकारने महाराष्ट्र राज्याच्या संबंधात इतर मागासवर्ग म्हणून घोषित केलेल्या नागरिकांचा समावेश आहे असा आहे ;

(झ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये शासनाने तयार केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(त्र) " अनुसूचित जाती " व " अनुसूचित जमाती " यांना भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३६६ च्या खंड (२४) व (२५) मध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिला असेल, तो अर्थ असेल ;

(ट) " पडताळणी समिती " याचा अर्थ, शासनाने कलम ६ च्या, पोट-कलम (१) अन्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांच्या जाती प्रमाणपत्र पडताळणीकरिता आणि या अधिनियमान्वये पडताळणी समितीची कामे पार पाडण्यासाठी रचना केलेली समिती किंवा समित्या असा आहे ;

(ठ) " विशेष मागासप्रवर्ग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाने, विशेष मागास प्रवर्ग म्हणून घोषित केलेला, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास नागरिकांचा वर्ग, असा आहे .

जाती प्रमाणपत्रासाठी अर्ज करणे.

३. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यापैकी कोणत्याही जातीच्या व्यक्तिंसाठी एकतर कोणत्याही सरकारी

नोकरीमधील किंवा एखाद्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी तरतूद केलेल्या कोणत्याही आरक्षणाचा लाभ मिळावा याकरिता किंवा भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १५, खंड (४) अन्वये केलेल्या कोणत्याही विशेष तरतुदींखालील कोणताही अन्य लाभ मिळविण्याकरिता किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणातील किंवा सहकारी संस्थांमधील निर्वाचित पद लढविण्याच्या प्रयोजनाकरिता किंवा आदिवासी भूधारकांकडून जमीन खरेदी करण्याकरिता किंवा जमिनीचे हस्तांतरण करण्याकरिता किंवा शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अन्य प्रयोजनांकरिता अशा लाभाची मागणी करताना, जिने जाती प्रमाणपत्र सादर करणे आावश्यक असते, अशा जाती, जमाती किंवा वर्गातील व्यक्ती, जाती प्रमाणपत्र मिळण्यासाठी विहित करण्यात येईल अशा स्वरुपात आणि अशा रीतीने सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करील.

सक्षम प्राधिकाऱ्याने द्यावयाचे जाती प्रमाणपत्र.

४. (१) सक्षम प्राधिकारी कलम ३ द्वारे त्यांच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर त्या अर्जातील मागणीच्या खरेपणाबद्दल खात्री करुन घेतल्यानंतर विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरल्यावर विहित करण्यात येईल अशा कालमर्यादेत आणि अशा नमुन्यात जाती प्रमाणपत्र देईल, किंवा कारणे लेखी नमूद करुन तो नामंजूर करील.

(२) सक्षम प्राधिकाऱ्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीने, अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र अवैध असेल. मात्र सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र पडताळणी समितीने त्याची पडताळणी करण्याच्या व वैधता प्रमाणपत्र देण्याच्या अधीन राहून वैध असेल.

अपील.

५. (१) कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या अर्ज फेटाळल्याच्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस तिला असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(२) अपील प्राधिकारी, अपिलकारास त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर अपिलकाराच्या दाव्याच्या खरेपणाबद्दल स्वतःची खात्री करुन घेतल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, एकतर सक्षम प्राधिकाऱ्यांचा अर्ज फेटाळल्याचा आदेश कायम करु शकेल किंवा तो आदेश रद्द करु शकेल आणि, जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास निर्देश देऊ शकेल.

पडताळणी समितीकडून जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी.

६. (१) शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यासाठी एक किंवा अधिक पडताळणी समित्या स्थापन करील, उक्त अधिसूचनेमध्ये अशा पडताळणी समितीचे किंवा अशा पडताळणी समित्यांचे कार्य व अधिकार क्षेत्र विनिर्दिष्ट करील.

(२) सक्षम प्राधिकाऱ्याकडून जातीचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर, कलम ३ मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी तरतूद करण्यात आलेले लाभ किंवा सवलतींचा फायदा घेण्यासाठी इच्छुक असलेली कोणतीही व्यक्ती, अशा जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी आणि वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधित पडताळणी समितीकडे वेळेवर विहित केलेल्या नमुन्यात व विहित पद्धतीने अर्ज करील.

(३) जातीचे प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या एखाद्या व्यक्तीची शासनामध्ये, स्थानिक प्राधिकरणामध्ये, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामध्ये, शैक्षणिक संस्थांमध्ये, सहकारी संस्थेमध्ये किंवा इतर कोणत्याही शासकीय अनुदानप्राप्त संस्थांमध्ये नियुक्तीसाठी निवड झालेली आहे आणि अशी व्यक्ती वैधता

प्रमाणपत्र मिळवू शकलेली नाही तर अशा व्यक्तींच्या बाबतीत, त्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी व वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी केंद्र किंवा राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था व इतर कोणत्याही शासकीय अनुदान प्राप्त संस्था यांचा नियुक्ती प्राधिकारी पडताळणी समित्यांनी विहित केलेल्या नमुन्यात व विहित केलेल्या पध्दतीने पडताळणी समितीकडे अर्ज करील.

(४) पडताळणी समिती, जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी विहित करण्यात येईल अशी कार्यपध्दती अनुसरील आणि पडताळणीसाठी आणि वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी विहित करण्यात आलेली कालमर्यादा कटाक्षाने पाळील.

जातीची खोटी प्रमाणपत्रे जप्त करणे व रद्द करणे.

७. (१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागासप्रवर्ग यापैकी कोणत्याही जातीत न मोडणाऱ्या व्यक्तीने, ती स्वतः किंवा तिची मुले अशा जातीतील, समाजातील किंवा वर्गातील आहेत, असे जातीचे खोटे प्रमाणपत्र मिळविले असेल तर, पडताळणी समिती, स्वाधिकारे, किंवा अन्य मार्गाने अभिलेख मागवील आणि अशा प्रमाणपत्राच्या अचूकतेविषयी चौकशी करील आणि हे प्रमाणपत्र लबाडीने मिळविले होते असे तिला आढळून आल्यास संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर विहित केलेली कार्यपध्दती अनुसरुन, आदेशाद्वारे प्रमाणपत्र रद्द करील व जप्त करील, आणि जे काही निर्णय असेल त्याबाबत संबंधित व्यक्तीला आणि कोणताही संबंधित प्राधिकारी असल्यास, त्याला त्याबद्दल कळवील.

(२) या अधिनियमान्वये पडताळणी समितीने दिलेला आदेश अंतिम असेल आणि याविरुध्द भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २२६ अन्वये उच्च न्यायालयाव्यतिरिक्त, कोणत्याही प्राधिकरणासमोर किंवा न्यायालयामध्ये आव्हान देता येणार नाही.

सिध्द करण्याची जबाबदारी.

८. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागासप्रवर्ग यांच्या संबंधातील जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कलम ३ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत आणि या अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडून किंवा पडताळणी समितीकडून किंवा अपील प्राधिकाऱ्याकडून करण्यात येणाऱ्या कोणत्याही चौकशीच्या बाबतीत किंवा या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या न्यायचौकशीच्या बाबतीत, आपण त्या जातीचे, जमातीचे किंवा वर्गाचे आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदार व्यक्तीवर असेल.

सक्षम प्राधिकरी अपील प्राधिकरण व पडताळणी समिती यांना दिवाणी न्यायालयाचा अधिकार असणे.

१९०८ चा ५.

९. या अधिनिमान्वये चौकशी करते वेळी सक्षम प्राधिकाऱ्यास, अपील प्राधिकरणास व पडताळणी समितीस दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाला असलेले सर्व अधिकार आणि विशेषतः पुढील विशिष्ट बाबतीत सर्व अधिकार असतील :-

(अ) कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठविणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे ;

(ब) कोणताही दस्तऐवज शोधून काढण्यास व दाखल करण्यास भाग पाडणे ;

(क) शपथपत्रांवर पुरावा स्विकारणे ;

(ड) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सरकारी अभिलेख किंवा त्याची प्रत मागवून घेणे ; आणि

(ई) साक्षीदारांची किंवा दस्ताऐवजांची तपासणी करण्यासाठी राजादेश काढणे .

जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे प्राप्त करण्यात आलेले लाभ काढून घेणे.

१०. (१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागासप्रवर्ग यापैकी कोणत्याही वर्गात मोडत नसलेल्या ज्या कोणत्याही व्यक्तीने, जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन कोणत्याही शैक्षणिक संस्थेत, अशा जाती, जमाती किंवा वर्ग याच्यासाठी राखीव असलेल्या जागेवर प्रवेश मिळविला असेल किंवा शासनामध्ये, स्थानिक प्राधिकरणामध्ये किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या इतर कोणत्याही कंपनीत किंवा महामंडळात किंवा कोणत्याही शासकीय अनुदानप्राप्त संस्थेत किंवा सहकारी संस्थेत, अशा जाती, जमाती किंवा वर्ग यांच्यासाठी राखीव असलेल्या पदावर नियुक्ती मिळविली असेल तर पडताळणी समितीकडून जातीचे प्रमाणपत्र रद्द करण्यात आल्यानंतर ती व्यक्ती संबंधित शैक्षणिक संस्थेमधून काढून टाकली जाण्यास किंवा यथास्थिती, उक्त सेवेतून तात्काळ सेवामुक्त केली जाण्यास पात्र ठरेल आणि उपरोक्तनुसार अशा प्रवेशाच्या किंवा नियुक्तीच्या अनुरोधाने अशा व्यक्तीने घेतलेले किंवा प्राप्त केलेले इतर कोणतेही लाभ तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) शासनाने किंवा इतर कोणत्याही अभिकरणाने शिष्यवृत्ती, अनुदान, भत्ता किंवा इतर वित्तीय लाभ यांच्या स्वरुपात अशा व्यक्तीस दिलेली कोणतीही रक्कम अशा व्यक्तीकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जे नंतर खोटे असल्याचे सिध्द झाले असेल अशा, जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे, कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळवून प्राप्त केलेली कोणतीही पदवी, पदविका किंवा इतर कोणतीही शैक्षणिक अर्हता, पडताळणी समितीने असे जातीचे प्रमाणपत्र रद्द केल्यानंतर रद्द होईल.

(४) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही व्यक्तीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग किंवा विशेष मागासप्रवर्ग यांच्यासाठी राखीव असलेल्या जागेवर अशा जातीत, जमातीत, किंवा वर्गात मोडत असल्याचे जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन स्थानिक प्राधिकरणाची, सहकारी संस्थेची किंवा कोणत्याही सांविधिक मंडळाची निवडणूक लढविली असेल तर, पडताळणी समितीने असे जातीचे खोटे प्रमाणपत्र रद्द केल्यानंतर ती कोणत्याही सांविधिक मंडळाचा सदस्य होण्यास अनर्ह ठरेल आणि अशा व्यक्तीने प्राप्त केलेले कोणतेही लाभ जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येतील. आणि अशा व्यक्तीची निवडणूक ही भूतलक्ष्यी प्रभावाने समाप्त झाली असल्याचे मानण्यात येईल.

अपराध व शास्ती.

११. (१) जी कोणतीही व्यक्ती :-

(क) खोटी माहिती सादर करुन किंवा खोटे विधान किंवा दस्तवेज दाखल करुन किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या लबाडीने, जातीचे खोटे प्रमाणपत्र मिळविते ; किंवा

(ख) ती कोणत्याही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग किंवा विशेष मागासप्रवर्ग यांमधील व्यक्ती नसताना जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन शासनामध्ये, स्थानिक प्राधिकरणामध्ये किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखालील इतर कोणत्याही कंपनीमध्ये किंवा महामंडळामध्ये किंवा कोणत्याही शासकीय अनुदान प्राप्त संस्थेमध्ये अशा जाती, जमाती किंवा वर्ग किंवा यांच्याकरिताच केवळ राखून ठेवण्यात आलेले

कोणतेही लाभ किंवा नियुक्त्या मिळविते किंवा कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये अशा जाती, जमाती, किंवा वर्ग यांच्याकरिताच केवळ राखून ठेवण्यात आलेल्या जागेवर प्रवेश मिळविते किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा सहकारी संस्थेच्या, अशा जाती, जमाती किंवा वर्ग यांच्याकरिता राखून ठेवण्यात आलेल्या कोणत्याही निर्वाचन पदावर निवडून येईल ;

अशा व्यक्तीस, अपराधसिध्दीनंतर, सहा महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) कोणतेही न्यायालय पडताळणी समितीने किंवा या प्रयोजनार्थ पडताळणी समितीने यथोचित रीत्या प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने केलेल्या, लेखी तक्रारीशिवाय, या कलमाखालील शिक्षापात्र अपराधाची दखल घेणार नाही.

या अधिनियमा-खालील अपराध दखलपात्र व बेजमानती असणे.

१२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, १९७४ चा २

(क) कलम ११ खालील शिक्षापात्र अपराध दखलपात्र व बेजमानती असतील ;

(ख) या अधिनियमाखालील प्रत्येक शिक्षापात्र अपराधाची संक्षिप्त रीतीने प्रथम श्रेणी दंडाधिकाऱ्याकडून न्यायचौकशी करण्यात येईल आणि या संहितेच्या कलम २६२ चे पोट-कलम (२) वगळता कलम २६२ ते २६५ (दोन्ही धरुन) च्या तरतुदी शक्य असेल तितपत, अशा न्यायचौकशीला लागू होतील.

जातीचे खोटे प्रमाणपत्र देणाऱ्यास शास्ती.

१३. (१) या अधिनियमान्वये, सक्षम प्राधिकाऱ्याची कामे पार पाडणारी जी कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकारी, हेतुपुरस्सर जातीचे खोटे प्रमाणपत्र देईल त्या व्यक्तीस अपराधसिध्दीनंतर सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल परंतु दोन वर्षापर्यंत असु शकेल इतक्या सश्रम कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) कोणत्याही न्यायालयास, या कलमाखालील शिक्षापात्र अपराधांची शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय दखल घेता येणार नाही.

अपप्रेरणा दिल्याबद्दल शास्ती.

१४. जो कोणी या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाला अपप्रेरणा देत असेल त्यास अशा अपराधाकरिता या अधिनियमामध्ये तरतूद केलेली शिक्षा होईल.

दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेस रोध.

१५. कोणत्याही दिवाणी न्यायालयास ज्या दाव्यामध्ये किंवा कार्यवाहीमध्ये करण्यात आलेली मागणी ही कोणत्याही प्रकारे या अधिनियमाच्या तरतुदींविरुध्द असेल तर, असा कोणताही दावा किंवा कार्यवाही विचारार्थ घेण्याची किंवा चालू ठेवण्याची किंवा त्यावर निर्णय घेण्याची अधिकारिता असणार नाही किंवा जो कोणताही हुकूमनामा किंवा आदेश संमत करणे किंवा निष्पादित करणे, कोणत्याही प्रकारे या अधिनियमाच्या तरतुदींच्याविरुध्द असेल असा हुकूमनामा किंवा आदेश संमत करता येणार नाही किंवा असा हूकुमनामा किंवा आदेश पूर्णतः किंवा अशंतः निष्पादित करता येणार नाही.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.

१६. हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम यांनुसार, सद्भावनेने करण्यात आलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणत्याही व्यक्तीविरुध्द

कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

**या अधिनियमाच्या तरतुदी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींमध्ये अधिक भर घालणे.**

१७. या अधिनियमाच्या तरतुदी ह्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींमध्ये अधिक भर घालणाऱ्या असतील.

**नियम तयार करण्याचा अधिकार.**

१८. (१) या अधिनियमाच्या सर्व किंवा काही तरतुदी पार पाडण्याकरिता राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, आणि पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीच्या अधीन राहून, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि पूर्वोक्त अधिवेशनाच्या किंवा लागोपाठच्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील, व तशा आशयाचा त्यांचा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून, यथास्थिती, अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा मुळीच अंमलात येणार नाही, तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

१९. (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर शासन, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेल्या तरतुदी करु शकेल.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

---

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालाक**

  **शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन**
  (प्रकाशन शाखा)
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : २३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**

  **शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार**
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : २६१२ ४७ ५९, २६१२ ५८ ०८
  २६१२ ८९ २०

- **व्यवस्थापक**

  **शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार**
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : २५ ६२ ६१५

- **सहायक संचालक,**

  **शासकीय ग्रंथागार**
  पैठणरोड, रेल्वेस्टेशन जवळ,
  औरंगाबाद ४३१ ००५.
  दूरध्वनी : २३३१५२५

- **व्यवस्थापक**

  **शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री ग्रंथागार**
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : २६ ५० ३९५ व २६ ५० ४०२

## व महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते